ePaper

## राज्यात हिंदुजा समूह करणार 35 हजार कोटींची गुंतवणूक



|वर्ष - 6 |अंक - 242 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

### आतील पानांत

- बाणेर, बालेवाडीचा पाणी पुरवठा सुरळीत करा - चंद्रकांत पाटील
- 'जल्लोष शिक्षणाचा' उपक्रम शाळांसाठी व्यासपीठ
- 'आप'की की कसम : 2024 ला 'झाडू'चा करिश्मा दिसणार?

www.mahaenews.com | |शुक्रवार |दिनांक 16 डिसेंबर 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

# सत्तेत राहण्यासाठी विरोधकांचा खटाटोप!

## आमदार महेश लांडगे : पिंपरी-चिंचवड भाजपा बूथ सक्षमीकरण

|पिंपरी |
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

महापालिकेची प्रभाग रचना करताना विरोधकांनी बहुतांशी प्रभागाची मोडतोड केली. चारचा प्रभाग अनुकूल वाटत नव्हता म्हणून त्यांनी तीनचा प्रभाग केला. त्यातही प्रभागाचा बराचसा भाग त्यांनी वगळला. नागरिक आपल्याला मतदान करणार नाहीत याची विरोधकांना बहुदा भीती वाटत होती. विरोधकांमध्ये निवडून यायचा विश्वासच नव्हता. सत्ता गेल्यानंतर आता कुणीही उठून आरोप करतो. त्याला आधार नसतो. केवळ चर्चेत रहाण्यासाठीच खटाटोप सुरु आहे. सत्ता बदलल्यानंतर गेल्या तीन महिन्यात लोकांची वाटणारी काळजी त्यांना मागच्या अडीच वर्षात का वाटली नाही, अशी टीका भाजपा शहराध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांनी केली.



शहर भाजपच्या वतीने प्रभाग क्रमांक १५ प्राधिकरण येथे बुथ प्रमुख, शक्ती केंद्र प्रमुख आणि कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आमदार लांडगे बोलत होते.

मेळाव्यास भाजप शहराध्यक्ष तथा आ. महेशदादा लांडगे, आ. उमाताई खापरे, मा. खा. अमर साबळे, राज्य प्रदेश प्रवक्ता एकनाथ पवार, मा. सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, पिं. चिं. नवनगर विकास प्राधिकरणाचे मा. अध्यक्ष सदाशिव खाडे, भाजयुमोचे प्रदेश सरचिटणीस आणि युवा वॉरियर्स प्रदेश संयोजक अनुप मोरे, मा. उपमहापौर शैलजाताई मोरे, मा. महापौर आर. एस. कुमार, विजय शिनकर, राजेंद्र बाबर, वृषालीताई, सलीम शिकलगार, अरुण थोरात, समीर जावळकर, सचिन कुलकर्णी, मनोज देशमुख, अतुल इनामदार, शर्मिला बाबर सर्व बूथ प्रमुख, शक्ती प्रमुख आणि पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच प्रभागातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आमदार लांडगे म्हणाले, गेल्या वीस वर्षात सत्तेवर असताना विरोधकांनी वाढत्या लोकसंख्येनुसार शहराच्या विकासाचे नियोजन केले नाही. त्यामुळे आज लोकांना पाण्याची, वाहतुकीची समस्या भेडसावत आहे. त्यामुळे सुविधांवर ताण येत आहे. मी आरोप-प्रत्यारोप न करता काम करणारा माणूस आहे. आमच्याकडे कामे आहेत ती बोलतात. आम्हाला कुण्याच्या विरोधात बोलायची गरज नाही. जो काम करतो त्याची बदनामी होतेच. भाजपचे केंद्र, राज्य आणि पालिकेचे काम यावर मी लक्ष केंद्रित केले आहे. शहरातील विद्यार्थी दर्जेदार शिक्षणासाठी शहर सोडून पुण्यात शिकायला जातात. तत्कालीन प्राधिकरणाचे अध्यक्ष सदाशिव खाडे आणि मी पुण्यातील मोठी महाविद्यालये आणि शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांची बैठक घेतली होती. बैठकीत प्राधिकरणाची जागा उपलब्ध करून परिसरात एजुकेशन हब स्थापन करण्याचा संकल्प केला होता. पुण्यातील शासकीय अभियांत्रिकी (सिओइपी) सारखे महाविद्यालय आम्ही शहरात आणले.

मा. खा. अमर साबळे, सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके यांनीही उपस्थित कार्यकर्त्यांना संबोधित केले. समीर जावळकर यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

### तर विरोधकांचे दोन उमेदवार पराभूत झाले असते : अनुप मोरे

प्रास्ताविक करतानाअनुप मोरे म्हणाले, गेल्या बावीस वर्षांपासून मी पक्षाचे काम प्रामाणीकपणे करतोय. वार्ड अध्यक्ष ते भाजप पदाधिकारी या काळात नागरिकांनी मला प्रेम आणि आशीर्वाद दिले. त्यामुळे भाजप हा येथील नागरिकांचा परिवार आहे. प्रभागातील ५२ बूथ पैकी ४२ बूथ प्रमुखांना ओळखपत्र दिले आहे. विकासकामे नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात येत आहेत. प्राधिकरणातील नागरिक केवळ भाजपसाठीच बाहेर पडतात. आगामी महापालिका निवडणुकीत पक्षाला अपेक्षित यश मिळवून देऊ. भविष्यात प्रभागातून चुकीचे लोक पक्षात येऊ शकतात, त्यांना अटकाव केला पाहिजे. २०१७ च्या निवडणुकीत तीनचा प्रभाग असता तर विरोधी पक्षाचे दोन विद्यमान नगरसेवक पराभूत झाले असते. भविष्यात आम्हाला पक्षाकडून पूर्ण ताकद हवी. नवीन उमेदवार न देता आहेत तेच उमेदवार कायम ठेवा म्हणत उपस्थितांचे आभार मानले.

# 'लोणावळा-पुणे- लोकल दिवसभर सुरू ठेवा !

## खासदार श्रीरंग बारणे : लोकसभा अधिवेशनात केली मागणी

|पिंपरी|
| महाईन्यूज | प्रतिनिधी|

लोणावळा-पुणे-लोणावळा या मार्गावर दुपारी 12 ते 2 या दरम्यान एकही रेल्वे धावत नाही. त्यामुळे विद्यार्थी, कामगारांची मोठी गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांचा वेळ जातो, अभ्यासही बुडतो. त्यासाठी लोणावळा-पुणे-लोणावळा या मार्गावर पूर्वीप्रमाणे दिवसभर रेल्वे गाड्या सोडाव्यात. तसेच सिंहगड एक्सप्रेसच्या बदललेल्या बोगी व्यवस्थेमुळे सीटांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे सकाळी पुण्याहून मुंबईला जाणा-या नागरिकांचे



हाल होत आहेत. त्यासाठी एक्सप्रेसचे दोन कोच वाढविण्याची आग्रही मागणी मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांनी लोकसभेत केली. संसदेचे हिवाळी अधिवेशन सुरु आहे. या अधिवेशनात खासदार बारणे मतदारसंघातील विविध प्रश्नांना वाचा फोडत आहे. लोणावळा-पुणे-लोणावळा या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधताना खासदार बारणे म्हणाले, कोरोना महामारीपूर्वी लोणावळा-पुणे या मार्गावर दिवसभर लोकल ट्रेन धावत होत्या. कोरोना काळात रेल्वेसेवा बंद केली होती. आता परिस्थिती पूर्वपदावर आल्याने सर्व रेल्वेगाड्या पूर्णपणे सुरु आहेत. परंतु, मावळ लोकसभा मतदारसंघातील लोणावळा-पुणे-लोणावळा दरम्यानच्या मार्गावर सर्व लोकल रेल्वे गाड्या अद्यापही धावत नाहीत. सध्या लोणावळा-पुणे-लोणावळा दरम्यान सकाळी 12 च्या अगोदर काही रेल्वे गाड्या धावतात. तर, दुपारी 12 ते 2 या वेळेत एकही रेल्वे गाडी धावत नाही. त्यामुळे या मार्गावरुन मोठ्या संख्येने प्रवास करणारे विद्यार्थी, सरकारी कर्मचारी, कामगार, औद्योगिक पट्टा असलेल्या तळेगाव दाभाडे, पिंपरी-चिंचवड भागातील सेकंड शिफ्ट केलेल्या कामगारांची मोठी गैरसोय होत आहे.

### सिंहगड एक्सप्रेसचे कोच वाढवा

सन 2020 मध्ये सिंहगड एक्सप्रेसच्या कोचची संख्या 19 वरुन कमी करत 16 केली. या बदललेल्या कोच व्यवस्थेमुळे सीटांची संख्या कमी झाली. 1908 वरुन 1818 सीट संख्या झाली. कोरोनाचा प्रादुर्भाव ओसरल्यानंतर सिंहगड एक्सप्रेसमध्ये जनरल तिकीटांची सुविधा सुरु केली. ही सुविधा सुरु करताना सिंहगड एक्सप्रेसच्या कोचची संख्या पुन्हा 2 ने कमी केली. आता केवळ 14 कोच आहेत. त्यामुळे सीटांची संख्या कमी होऊन 1300 झाली आहे. 2 कोच कमी केल्याने पुणे-मुंबई-पुणे प्रवास करणा-या रेल्वे प्रवाशांना विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे. सकाळी पुण्यातून मुंबईला जाणारी सिंहगड एक्सप्रेस पहिली गाडी आहे. त्यामुळे हजारो प्रवासी या गाडीने मुंबईला जातात. सीटांची संख्या कमी असल्याने प्रवाशांना उभा राहून प्रवास करावा लागतो. यामध्ये लहान मुले, महिला प्रवाशांची संख्या अधिक असते. त्यामुळे सिंहगड एक्सप्रेसला 2 कोच वाढवून 16 कोच करावेत. जेणेकरुन जनरल कोचमधून प्रवास करणा-या प्रवाशांना जागा उपलब्ध होईल, अशी महत्त्वपूर्ण मागणीही खासदार बारणे यांनी केली आहे

# पाणी पुरवठा सुरळीत करा!

## बाणेर - बालेवाडी पाणी प्रश्नावर बैठक, पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांची सूचना

पुणे
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे - वारजे जलशुद्धीकरण केंद्रात होणाऱ्या वारंवार बिघाडाचा फटका बाणेर, बालेवाडी भागाला बसत आहे. महापालिकेकडून सुधारणा केल्या जात असल्याचा दावा केला जात असला तरी कामाची गती संथ असल्याने नागरिक हैराण झाले आहेत.



त्यावर आज वारजे जलशुद्धीकरण केंद्र ते बालेवाडी या दरम्यान टाकल्या जाणाऱ्या जलवाहिनीचे उर्वरित २ किलोमीटरचे काम लवकर पूर्ण करा, पंपिंगच्या मोटारींची संख्या वाढवा अशी सूचना पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या आहेत.

विधानभवन येथे चंद्रकांत पाटील यांनी बालेवाडी, बाणेर भागातील पाणी प्रश्नावर बैठक घेतली. महापालिका आयुक्त विक्रम कुमार, जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख, अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता अनिरुद्ध पावसकर यावेळी उपस्थित होते. वारजे जलशुद्धीकरण केंद्रातील पंपिंग यंत्रणेत बिघाड झाल्याने बाणेर व बालेवाडी परिसरातील पाणी पुरवठा विस्कळित होत आहे. तसेच वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर या भागाला पाणी उशिराने व कमी पाणी मिळत आहे. यावर बैठकीत चर्चा झाली.

महापालिकेतर्फे या भागासाठी ४६ एमएलडी जलवाहिनीद्वारे पाणीपुरवठा

### सिंहगड रस्त्यावर आमदारांसह पाहणी

**सिंहगड रस्त्यावर उड्डाणपुलाचे काम सुरू असताना वडगाव येथून येणाऱ्या नागरिकांना उजवीकडे वळण्यासाठी रस्ता आवश्यक आहे, अन्यथा मोठा वळसा घालावा लागेल यासाठी आमदार भीमराव तापकीर यांनी भुयारी मार्गाची मागणी केली आहे. पण तेथे जागा कमी असल्याने प्रशासनाने नकार दिला आहे. या प्रश्नावर काही दिवसांपूर्वी पाटील यांनी बैठकीत चर्चा केली होती. पण त्यात आमदार माधुरी मिसाळ यांनी विरोध केल्याने वाद झाला होता. आज पाटील यांनी या विषयावर पुन्हा एक बैठक घेतली. त्यामध्ये तापकीर यांच्यासह महापालिकेचे अधिकारी उपस्थित होते.**

## पुणे महापालिकेत समाविष्ट ९ गावांच्या मिळकतकरात होणार बदल?

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे महापालिकेत समाविष्ट ११ गावांपैकी फुरसुंगी आणि उरुळी देवाची हे दोन गावे बाहेर पडली आहेत. पण उर्वरित ९ गावातील मिळकतकराची समस्या कायम आहे. त्यामुळे या गावातील नागरिकांना दिलासा देता येईल का यासाठी सुधारणा करण्याचा प्रयत्न सुरू झाला आहे. महापालिका आयुक्तांनी यासंदर्भात अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांची तीन सदस्यीय समिती स्थापन केली आहे. पुढील पंधरा दिवसात या समितीचा अहवाल आल्यानंतर योग्य निर्णय घेतला जाईल असे आयुक्त विक्रम कुमार यांनी स्पष्ट केले.




मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे झालेल्या बैठकीत फुरसुंगी आणि उरुळी देवाची या दोन गावांना महापालिकेतून वगळून त्यांची स्वतंत्र नगरपालिका करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर आज बाळासाहेबांची शिवसेना पक्षाचे नेते व माजी राज्यमंत्री विजय शिवतारे यांनी उर्वरित ९ गावांसाठी महापालिकेत बैठक घेतली. त्यामध्ये मिळकतकर आणि पाणी या दोन विषयावर चर्चा झाली. पत्रकारांशी बोलताना विक्रम कुमार म्हणाले, "शिवतारे यांच्यासोबत आज ९ गावांमधील मिळकतकर आणि पाणी समस्येवर चर्चा झाली. २०१७ मध्ये ११ गावांना एकाच पद्धतीने मिळकतकर लावला होता. दोन गावे वगळण्यात आल्याने उर्वरित ९ गावांसाठी मिळकतकरात सुधारणा करून नागरिकांना दिलासा देता येईल का यावर चर्चा झाली. त्यामध्ये या गावात लावला गेलेला कराचा अभ्यास करून त्याचा अहवाल सादर करण्यासाठी अतिरिक्त आयुक्त खेमनार यांच्या अध्यक्षतेखाली तीन सदस्यांची समिती गठित केली आहे. पुढील १५ दिवसात या समितीचा अहवाल सादर होईल. त्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल.९ गावातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी सल्लागार नेमून आराखडा तयार करण्याचे काम सुरू असल्याचे शिवतारे यांना सांगण्यात आले. पण ही दीर्घकालीन उपाय योजना आहे. लोकांना लगेच दिलासा देता यावा यासाठी काही करावे अशी मागणी शिवतारे यांनी केली.

## जी-२० मध्ये वाहतूक कोंडी टाळण्यासाठी मेट्रोच्या कामाला ब्रेक?

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

शहरात जानेवारी महिन्यात होणाऱ्या 'जी-२०' परिषद होणार असून, यावेळी सुमारे ३६ देशातील २०० ते २५० प्रतिनिधी उपस्थित असणार आहेत. या काळात गणेशखिंड रस्त्यावर वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून तीन ते चार दिवस मेट्रोचे काम बंद ठेवून, बॅरेकेडींग कमी करून रस्ता मोठा करण्याच्या दृष्टीने विचारविनिमय सुरू झाला आहे. मात्र, याबाबतचा अंतिम निर्णय पीएमआरडीएशी चर्चा करून घेतला जाणार आहे.

पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी आज विधानभवन येथे १५ व १६ जानेवारी होणाऱ्या 'जी २०' परिषदेच्या पूर्वतयारी संदर्भात बैठक घेतली. या वेळी विभागीय आयुक्त सौरभ राव, पुणे महानगरपालिका आयुक्त विक्रम कुमार, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह, जिल्हाधिकारी डॉ.राजेश देशमुख, पोलिस सहआयुक्त संदीप कर्णिक, पोलिस अधीक्षक अंकित गोयल, अपर जिल्हाधिकारी विजयसिंह देशमुख आदी उपस्थित होते.

त्यामध्ये गणेशखिंड रस्त्यावर शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रोचे काम सुरू आहे. त्यासाठी रस्त्याच्या मध्यभागी बॅरिकेटींग करण्यात आलेले आहे. सेनापती बापट रस्त्यावरील पंचतारांकित हॉटेलमध्ये देश विदेशातील प्रतिनिधींची राहण्याची व्यवस्था आहे.

## ग्रामपंचायत निवडणुकीच्या प्रचाराला पालकमंत्री चंद्रकांत पाटील

कडूस ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी (ता.14) सायंकाळी खेड तालुक्यातील बाराशे बहात्तर मतदार संख्या असलेल्या आदिवासी बहुल भागातील ग्रामपंचायत निवडणुकीची रणधुमाळी सुरू असलेल्या साकुर्डी गावात हजेरी लावली. 'चांगल्या माणसांच्या



आपण पाठीशी उभे राहायचे असते. यामुळे चांगल्या माणसांना निवडून द्या, हे सांगण्यासाठी मी या ठिकाणी आलो आहे,' असे सुरुवातीलाच स्पष्ट करीत 'योग्य व चांगल्या उमेदवारांना निवडून द्या,' असे या वेळी जाहीर आवाहन त्यांनी केले.खेड तालुक्यातील चासकमान धरणाच्या उशालगत दुर्गम भागातील १६७६ लोकसंख्या व १२७२ मतदार संख्या असलेल्या साकुर्डी ग्रामपंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. तीन वॉर्डमधून नऊ सदस्य व लोकांमधून सरपंच निवडून देण्यासाठी रविवारी (ता.१८) मतदान होणार आहे. यासाठी एकासएक पद्धतीने दोन पॅनेलमध्ये निवडणुकीची सरळ लढत होत आहे. दोन पॅनेलमध्ये 'काटे की टक्कर' अनुभवायला मिळत आहे. प्रचार शिगेला पोचलेला असतानाच जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनी बुधवारी सायंकाळी अचानक गावात हजेरी लावली. पालकमंत्र्यांनी नुसतीच हजेरी लावली नाही तर जाहीर जोरदार भाषण सुद्धा ठोकले. यामुळे एरव्ही पंचक्रोशीबाहेर चर्चेत नसलेली साकुर्डी ग्रामपंचायतीची निवडणूक तालुक्यातील राजकारणात चर्चेचा विषय ठरली आहे. पालकमंत्री पाटील म्हणाले, 'मी सगळ्यांना न्याय देणारा आहे. राष्ट्रवादी, काँग्रेसवाले पण त्यात आहेत. पण जी योग्य व चांगली माणसे आहेत, ज्यांच्यासाठी मी प्रचारात फिरतो आहे, त्यांना विकास निधीमध्ये प्राधान्य देईन. ग्रामपंचायतीची निवडणूक पार्टीच्या चिन्हावर लढवली जात नाही, पण चांगल्या माणसांच्या पाठीशी उभे राहायचे आले.

# ‘जल्लोष शिक्षणाचा’ उपक्रम शाळांसाठी व्यासपीठ

## आयुक्त शेखर सिंह : शहरातील शाळांनी सहभागी होण्याचे आवाहन

पिंपरी । महाईन्यूज ।

**शालेय विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्यातील सर्जनशील विचार आणि कल्पनांना चालना मिळावी यासाठी ‘जल्लोष शिक्षणाचा २०२३’ हा उपक्रम एक उत्तम व्यासपीठ आहे. या उपक्रमामध्ये शहरातील जास्तीत जास्त शाळांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.**



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने जल्लोष शिक्षणाचा २०२३ हा उपक्रम राबविण्यात आला आहे. या उपक्रमाचे उद्घाटन आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते आज पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात संपन्न झाले. हा उपक्रम स्पर्धात्मक असून या उपक्रमामध्ये शहरातील सर्व शाळांना सहभागी करण्यात येणार आहे. तसेच केंद्र शासनाच्या वतीने अर्बन आउटकम्स फ्रेमवर्क या उपक्रमांतर्गत ‘चला आपले शहर जाणून घेऊया’ याबाबत शहरात सर्वेक्षण सुरु आहे. या सर्वेक्षणात शाळांचा परिणामी विद्यार्थी आणि पालकांचा सहभाग वाढावा या अनुषंगाने शहरातील महापालिका आणि खाजगी शाळांच्या मुख्याध्यापकांशी संवाद साधताना ते बोलत होते.

या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शिक्षण विभागाचे उपआयुक्त संदीप खोत, प्रशासन अधिकारी संजय नाईकडे, सहायक प्रशासन अधिकारी रजिया खान, पर्यवेक्षक सुनील लांघी यांच्यासह शहरातील सुमारे ५०० हून अधिक महापालिका आणि खाजगी शाळांचे मुख्याध्यापक तसेच शाळांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

महापालिकेच्या सीटीओ विभागाच्या ऋतुजा करकरे आणि प्रज्ञा ठाकूर यांनी ‘जल्लोष शिक्षणाचा २०२३’ याबाबत सविस्तर माहिती दिली. स्मार्ट सारथी टीमचे आशिष चिकणे यांनी ‘अर्बन आउटकम्स फ्रेमवर्क’ संदर्भात माहिती यावेळी दिली.

### विजेत्या शाळांना मिळणार बक्षीस...

**आयुक्त शेखर सिंह म्हणाले, महापालिकेच्या वतीने राबविण्यात आलेल्या ‘जल्लोष शिक्षणाचा २०२३’ हा उपक्रम नाविन्यपूर्ण गोष्टींना अनुसरून असणार आहे. पिंपरी चिंचवड शहरातील महापालिका शाळा आणि खाजगी शाळांना एकच व्यासपीठ उपलब्ध व्हावे असा महापालिकेचा मानस आहे. शाळांच्या सर्जनशील कल्पनांना मुलांच्या कलागुणांना उत्तम व्यासपीठ मिळावे यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले आहे. हा उपक्रम स्पर्धात्मक असून या स्पर्धेतील विजेत्या शाळा आणि विद्यार्थ्यांना महापालिकेच्या वतीने बक्षिस देण्यात येणार आहे. या उपक्रमामध्ये शहरातील जास्तीत जास्त शाळांचा सहभाग अपेक्षित आहे. मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून या मध्ये सहभागी करावे, असे आयुक्त सिंह यांनी यावेळी उपस्थित मुख्याध्यापकांना सांगितले.**

# चांदखेडमधील संतप्त शेतकऱ्याने ऊस पेटवला !

## संत तुकाराम साखर कारण्याचे तारीख पे तारीख : शेतकऱ्यांमध्ये नाराजीचा सूर

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कासारसाई येथील श्री संत तुकाराम सहकारी साखर कारखान्याच्या तारीख पे तारीख या वेळखाऊ धोरणाला वैतागून शेतकऱ्याने रागाच्या भरात चांदखेड येथील सव्वा एकर ऊस क्षेत्राला आग लावल्याची घटना रविवारी (दि.११) दुपारी घडली. संतोष बारणे असे त्रस्त झालेल्या व ऊस जाळणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे.**



संतोष बारणे हे पिंपरी-चिंचवड महापालिकेतील माजी विरोधी पक्षनेते असून त्यांची चांदखेड (ता. मावळ) येथे पाच एकर शेती आहे. त्यांनी जुलै २०२१ मध्ये ऊस लागवड केली. कासारसाई येथील संत तुकाराम सहकारी साखर कारखान्यात बियाणं उपलब्ध नसल्याने त्यांनी साताऱ्याहून बियाणं आणून लागवड केली.

ऊस लागवड तसेच ऊस बांधणीसाठी सर्व खते वापरली, सर्वतोपरी काळजी घेतली. मशागतीची व खतांची सर्व बिले असल्याचेही त्यांनी सांगितले. ऊस मोठा झाल्यानंतर १४ महिन्यांनी ऊसतोड होणे अपेक्षित होते मात्र तसे काही झाले नाही.

ऊसाचे वजन घटण्याआधी, त्याला तुरे येण्याआधी वेळेत ऊसतोड व्हावी म्हणून कारखान्यातील अधिकाऱ्यांशी त्यांनी पाठपुरावा सुरू केला. मात्र, वेळोवेळी त्यांना तारखाच मिळाल्या. पाच एकर पैकी २५-३० गुंठ्यातील ऊस पोसला नव्हता त्याचे कारण देत चांगल्या प्रतीचा ऊस तोडण्यासाठीही उशीर केला. अखेर तीन महिन्यांनी ऊस तोडणीसाठी टोळ्या दाखल झाल्या.

सुमारे चार एकरातील ऊसतोड झाल्यानंतर सव्वा एकरातील ऊस तोड न करताच टोळी गायब झाली. यानंतर पुन्हा कारखानाच्या अधिकाऱ्यांना संपर्क साधला असता आज-उद्या असे करत त्यात महिना उलटल्याने संतप्त बारणे यांनी राहिलेला ऊस जाळून राख केला.

> **अधिकाऱ्यांच्या टोलवा टोलवीला वैतागुणच ऊस जाळून लाख रुपयांचे नुकसान केले आहे. शिरूर, हवेली, जुन्नर व इतर तालुक्यात वेळेवर ऊसतोड होते. मात्र, मावळ-मुळशीतील शेतकरी चेअरमन नानासाहेब नवले यांचा आदर करत असल्याने सौजन्य दाखवतात. याचाच अधिकारी गैरफायदा घेऊन छळ करतात. कारखान्याच्या वीज निर्मिती प्रकल्पासाठी मुद्दामहून विलंब केला जातो. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते, शेतीही गुंतून राहते.**
>
> **– संतोष बारणे, ऊस उत्पादक शेतकरी, थेरगाव .**

> **त्या ऊसाची योग्य देखभाल व मशागत न केल्याने थोड्या ऊसाची गुणवत्ता खराब होती. अशा ऊसाची ऊसतोड करण्यास ऊसतोड कामगार टाळाटाळ करतात. त्यामुळे त्यांची जुळवाजुळव करण्यात वेळ गेल्याने काही प्रमाणात ऊस तोडीस उशीर झाला.**
>
> **– साहेबराव पठारे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री संत तुकाराम साखर कारखाना.**

# 'आप'की की कसम : 2024 ला 'झाडू'चा करिश्मा दिसणार ?



भूमिका

निलेश दुटाळ
91- 87668 40811

गुजरात व हिमाचल प्रदेश विधानसभा तसेच दिल्ली महापालिका निवडणुका नुकत्याच पार पडल्या या तिनही राज्यात कोणत्याही एकाच राजकीय पक्षाला विजय प्राप्त झाला नाही. तीनही राज्यात भाजप, काँग्रेस, तसेच आम आदमी पार्टी (आप) असा तीन वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी विजय मिळवला आहे. तीनही राज्यात तीन पक्षांना स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. 2024 च्या निवडणुकीमध्ये 2017 च्या निवडणुकीच्या तुलनेत मोठ्या प्रमाणात बदल होण्याचे संकेत या निवडणुकीच्या अनुषंगाने आपणाला पहायला मिळत आहेत.

गुजरात विधानसभा निवडणुकीमध्ये भाजपाने बहुमत सिद्ध करत सातव्यांदा आपली सत्ता कायम ठेवली आहे. भाजपाने 157 जागा मिळवून विक्रमी बहुमत प्राप्त केले आहे. तर काँग्रेस आणि आपला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले. काँग्रेसला केवळ 16 जागा व आपला केवळ 5 जागेवर समाधान मानावे लागले. गुजरातमध्ये भाजपला हरवण्यासाठी काँग्रेस तसेच आपल्याला फार मोठी ताकद लावावी लागेल. कारण, गुजरातमध्ये अंबानी व अदानी यांचे आर्थिक नेतृत्व त्याचबरोबर पंतप्रधान नरेंद्र मोदी व केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचे होमग्राऊंड तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची मोठी ताकद भाजपच्या पाठीशी आहे. दुसरीकडे गुजरातमध्ये प्रचार व प्रसार करण्यास काँग्रेस नेतृत्व फारच कमी पडले. काँग्रेसचे राहुल गांधी तसेच प्रियांका गांधी यांनी गुजरातला फार



कमी वेळ दिला तसेच काँग्रेस अध्यक्ष खर्गे हे अखेरच्या टप्प्यात प्रचाराला उतरले. काँग्रेसला केवळ 27% मतदान झाले तर आपला 13% मतदान झाले आणि भाजपाला 52% मतदान झाले. दोन्ही पक्षांचे मतदान देखील भाजपाची बरोबरी करु शकले नाही. मोठ्या पराभवाला काँग्रेस व आपला सामोरे जावे लागले.

गुजरात पहिल्यांदाच आपने आपले उमेदवार उभे केले होते. मात्र त्याचा फायदा भाजपला जास्त झाला. गुजरातमध्ये आप आणि काँग्रेसने एकमेकांची मते आपणाकडे वळवली त्याचा फायदा मात्र भाजपला झाला. गुजरातमध्ये 'आप'ला 5 जागा जरी मिळाल्या असल्या तरी त्याचा दुहेरी फायदा आप ला स्थानिक व राष्ट्रीय पक्षाचा दर्जा मिळाल्यामुळे देशात आता 9 राष्ट्रीय पक्ष असणार आहेत.त्यातच एक दिवस अगोदर आपने दिल्ली महापालिकेमध्ये मोठ्या प्रमाणात विजय संपादन केला आहे. दिल्लीत आपने 134 जागा मिळवून भाजपाच्या 15 वर्षाच्या एक हाती सत्तेला पराभूत केले आहे. महापालिकेत स्पष्ट बहुमत प्राप्त केले आहे. दिल्ली महापालिकेत आपने 43% मते मिळवली आहेत. दिल्ली महापालिकेमध्ये 2007 पासून भाजपाची सत्ता होती. 2017 मध्ये भाजपाने 181 जागा जिंकल्या होत्या तर आपने 48 जागा जिंकल्या होत्या. यावेळी आपने 134 जागा जिंकून मोठा विजय संपादन केला आहे. त्यामुळे देशात कोनाचेही सत्ता असो. देशाची राजधानीत मात्र आपचीच सत्ता असणार आहे. असे आप ठणकावून सांगणार आहे.हिमाचल प्रदेश विधानसभेमध्ये काँग्रेसने 35 जागा मिळवून बहुमत प्राप्त केले आहे. हिमाचल प्रदेशमध्ये सत्ताधारी भाजपाला मोठ्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. मागील निवडणुकीमध्ये भाजपला 68 पैकी 44 जागा मिळाल्या होत्या तर काँग्रेसला केवळ 21 जागा मिळाल्या होत्या. हिमाचल प्रदेशमधील काँग्रेसला विजय भाजपसाठी चिंता वाढवणारा ठरणार आहे. तर काँग्रेसला पुनरुज्जीवन मिळणार आहे. हिमाचल प्रदेशमधील काँग्रेसचा विजय भाजपाच्या जिव्हारी लागणार आहे. तर काँग्रेससाठी नवीन आशा पल्लवीत करणारा ठरणार आहे. तर भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या होत ग्राऊंडवरचा पराभव भाजपासाठी धोक्याची घंटा ठरणार आहे. मात्र हिमाचल प्रदेशमध्ये जे.पी. नड्डा यांनी प्रचारात कोणतीही कसर ठेवलेली नसताना तसेच प्रचारात पंतप्रधान नरेंद्र मोदी व अमित शाह देखील उतरलेले असताना भाजपचा झालेला पराभव 2024 या निवडणुकीत मोठे बदल होणार असल्याचे संकेत देत आहे. या तीन राज्यांच्या निवडणुकीतून देशातील जनतेला अनेक राजकीय संदेश मिळत आहेत. हिमाचल प्रदेशमधील विजय काँग्रेसला नवसंजीवनी देणारा, तर भाजपाला आपणच निवडून येणार असल्याच्या अविर्भावात न राहण्याचा संदेश देत आहे. तर आपला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळाल्यामुळे 2024 च्या निवडणुकीत आप महाराष्ट्र तसेच देशाच्या अनेक राज्यांतून निवडणूक लढवणार असल्याचे संकेत देत आहे. तर आपला राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळाल्यामुळे 2024 च्या निवडणुक आप महाराष्ट्र तसेच देशाच्या अनेक राज्यांतून निवडणूक लढवणार असल्याचे संकेत देत आहे. भाजपचे कमळ किती क्षमतेने फुलेल, काँग्रेसचे साखळी सोडलेले हात हातात घेऊन काँग्रेसची साखळी कुठपर्यंत पोहोचेल किंवा आपचा झाडू देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत साफसफाई करेल हे आपणाला 2024 च्या निवडणुकीत समजेल.

## संपादकीय

### उद्योगच उघडतील 'समृद्धी'चे दार

*हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा नागपूर-शिर्डी टप्प्याचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्याने विदर्भ-मराठवाड्याच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत. राज्यातील 'मागास भाग' हा शिक्का पुसण्याची ही संधी आहे, असे आता वाटू लागले आहे. हा महामार्ग ज्या गतीने साकारला गेला तीच गती या भागाच्या आर्थिक विकासासाठी दाखविली गेली तर या भागाची भरभराट दूर नाही. महाराष्ट्रात सध्या मुंबई, पुणे आणि नाशिक असा विकासाचा सुवर्ण त्रिकोण तयार झाला आहे. त्या तुलनेत उर्वरित महाराष्ट्र अविकसित किंवा काही ठिकाणी अगदी भकास राहिला आहे. राजधानी मुंबईपासून दूर असलेले विदर्भ आणि मराठवाडा हे प्रांत तर विकासापासून कोसो मैल दूर आहेत. कायम मागास भाग म्हणून विदर्भ-मराठवाडा टापूला हिणवले जाते. परंतु त्यांची ही अवस्था का आहे याचा विचार होत नाही. आता विकासाच्या वाटेवरील अडथळे दूर कण्याची गरज आहे. समृद्धी महामार्गात ती कोंडी फोडण्याची क्षमता आहे.*

## तोचि करावा गावाचा पुढारी!

**गावाचा थेट सरपंच कुणाला व्हायचे आहे असे सगळे गडी आता निवडणूक रिंगणात गोळा झाले आहेत. येत्या पाच दिवसांनी म्हणजे १८ तारखेला आपल्या गावाचा पुढारी कोणाला करायचे आहे यासाठी मतदान होणार आहे.**

सध्या जे रिंगणात आहेत ,त्यापैकी कुणातरी एकाचा निर्णय गावकऱ्यांना घेऊन गावाचे भाग्य येत्या पाच वर्षासाठी त्याच्या हातात सुपूर्द करायचे आहे. अजून निर्णय व्हायचा आहे , नेमके कुणाला निवडावे हा संभ्रम कायम आहे. वेळ आहे , बघू शेवटच्या दिवशी,कोण काय देतो यावर करू निर्णय ,या विचारात असाल तर तुम्ही चूक करताहात. शेवटच्या रात्री कुणी काहीही देणार नाही,उलट जो काहीतरी द्यायला येईल तो गावाचा क्रमांक एकचा शत्रू आणि आपल्या भविष्याचा मारेकरी समजला पाहिजे. त्यामुळे रिंगणात असलेल्या दोनचार लोकांपैकी कोण विकासाचा शिल्पकार ठरू शकेल याचा आताच निर्णय घेऊन टाका आणि उरलेल्या तीन दिवसात त्याच्या बाजूला कसे मतदान होईल यासाठी प्रयत्न करा.

तीनचार लोक आहेत, सर्वच आपल्या जवळचे आहेत किंवा सर्वच चांगले आहेत मग कुणा एकाची निवड कशी करावी ? या चिंतेत पडला असाल तर जवळच्या सर्वांना गावाच्या हिटाची चाळणी लावा आणि त्यात जो टिकेल त्याला हमखास मतदान करून निवडून आणा. मग ही गावाच्या किंवा सार्वजनिक हिताची चाळणी कुठून आणावी ? ती कशी लावावी ? असे होपलेस प्रश्न नका विचारू. ज्याला गावाचा सरपंच करायचे आहे ती व्यक्ती माणूस म्हणून कशी आहे ? ती शिक्षित आहे का ? इंग्रजी भाषेचे ज्ञान आहे का ? तिच्यात वक्तृत्व,नेतृत्व गुण आहेत का ? इतरांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याची क्षमता तिच्यात आहे का ? गावाला किंवा लोकांच्या समस्या जाणून ,सोडवणूक करण्यासाठी तिच्याकडे भरपूर वेळ आहे का ? विकास आणि गावाचे भले या विषयावर दहा मिनिटे तरी ती स्वतंत्रपणे विचार मांडू शकते का ? जात,धर्म,पंथ,पक्ष किंवा गटाच्या व्यतिरिक्त काम करण्यावर ती काय विचार करते ?

शिक्षण,आरोग्य,महिला आणि नागरिकांच्या प्रश्नावर किंवा ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीत ती कसा विचार करते ? या प्रश्नांच्या उत्तरात जो ६० टक्क्यांच्या वर उत्तरे देऊन पास होईल तीच व्यक्ती आपल्या गावाचा पुढारी होण्यास लायक असेल असे समजायला हरकत नाही. सरपंच पदासाठी रिंगणात असलेली व्यक्ती कोणत्या जाती,धर्माची आहे किंवा गरीब,श्रीमंत आहे यापेक्षा गावाच्या विकासात,आधुनिकीकरणात तिचा वाटा किती असेल यावर विचार करायला हवा. एखादा उमेदवार श्रीमंत आणि वयाने मोठा आहे मात्र त्याला कवडीची अक्कल नसेल तर वयाने तरुण आणि निर्धन असणारा मात्र ज्ञान,विकास आणि आधुनिक जगासोबत चालणाऱ्या तरुणाला निवडले पाहिजे. आपला एक दिवसांचा चुकीचा निर्णय गावालाच नव्हे तर येणाऱ्या पिढ्यांना मागे नेणारा ठरू शकतो हे समजून घ्या.

तोचि करावा पुढारी,पडो नये कुणाच्याही आहारी
धन वेचतो म्हणोनि गावाधिकारी

## ।। अभंगवाणी ।।



बोलायाचा त्यासीं ।
नको संबंध मानसीं ॥१॥
जया घडली संतनिंदा ।
तुज विसरूनि गोविंदा ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# विस्तार रखडल्याने शिंदे गटाचे आमदार नाराज!

## मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त पुढे गेल्यानं शिंदे गटातील आमदारांची नाराजी वाढली आहे.

। नागपूर:। महाईन्यूज ।



राज्य मंत्रिमंडळ विस्तार आणखी लांबणीवर पडला आहे. विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेधनाआधी मंत्रिमंडळ विस्तार होईल अशी अपेक्षा सत्ताधाऱ्यांमधील मंत्रिपदासाठी उत्सुक आमदारांना होती. मात्र मंत्रिमंडळाचा विस्तार अधिवेशनानंतरच होण्याची शक्यता वाढली आहे. 19 ते 29 डिसेंबर दरम्यान अधिवेशन संपन्न होईल. मंत्रिमंडळ विस्ताराचा मुहूर्त पुढे गेल्यानं शिंदे गटातील आमदारांची नाराजी वाढली आहे.

कॅबिनेटचा विस्तार करण्यासाठी भाजपच्या वरिष्ठ नेत्यांकडून हिरवा कंदिल मिळालेला नाही. मात्र यामुळे भाजपच्या मंत्र्यांची अडचणदेखील वाढली आहे. ममंत्रिमंडळ विस्तार झालेला नसल्यानं सध्या अनेक खात्यांचा कार्यभार सांभाळावा लागत आहे. अशा परिस्थितीत हिवाळी अधिवेशनात विरोधकांच्या प्रश्नांना सामोरं जाणं कठीण होणार आहे, असं एका मंत्र्यानं सांगितलं.

हिवाळी अधिवेशनाआधी मंत्रिमंडळाचा विस्तार होईल, असं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 23 ऑक्टोबरला सांगितलं होतं. मात्र अधिवेशन तोंडावर येऊनही अद्याप विस्तार झालेला नाही. तो अधिवेशनानंतरच होणार असल्याचं जवळपास निश्चित झालं आहे. 25 ऑक्टोबरला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गडचिरोलीला गेले होते. त्यावेळी त्यांनी नागपुरलादेखील भेट दिली. मात्र त्यांनी मंत्रिमंडळ विस्ताराची नेमकी तारीख सांगितली नाही. योग्य वेळी होईल, असं म्हणत त्यांनी वेळ मारून नेली. फडणवीसांनी विस्ताराबद्दल बोलून दीड महिना उलटला आहे. अधिवेशन 4 दिवसांवर आले आहे. मात्र विस्ताराची शक्यता दिसत नाही.

शिंदे गटातील अनेक आमदारांना मंत्रिपदाची अपेक्षा आहे. मागील विस्तारानंतर माजी मंत्री बच्चू कडू यांनी त्यांची नाराजी उघड बोलून दाखवली होती. रामटेकचे आमदार आशिष जैस्वाल यांनादेखील मंत्रिपदाची आस आहे. ठाकरेंविरुद्धच्या बंडात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. बडनेऱ्याचे आमदार रवी राणा यांनाही मंत्रिपदाची अपेक्षा आहे. ठाकरे मुख्यमंत्री असताना हनुमान चालसावरून त्यांनी रान पेटवलं होतं. त्यासाठी त्यांना तुरुंगवास भोगावा लागला होता.

शिंदे गटासोबत गेलेले अपक्ष आमदार, भाजपमधील अनेक आमदार मंत्रिमंडळ विस्ताराकडे डोळे लावून बसले आहेत. पावसाळी अधिवेशवाच्या 10 दिवसांपूर्वी मंत्रिमंडळ विस्तार झाला होता. भाजप आणि शिंदे गटाच्या प्रत्येकी 9 जणांनी मंत्रिपदाची शपथ घेतली होती. त्यामुळे हिवाळी अधिवेशनाच्या आधीही मंत्रिमंडळ विस्तार होईल अशी अपेक्षा अनेकांना होती. मात्र सध्या तरी विस्ताराची कोणतीही चिन्हं दिसत नाहीत.

# शेतकऱ्यांसाठी खूशखबर!

## अतिवृष्टीच्या नुकसानभरपाईत मोठी वाढ

। नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**शेतकऱ्यांना दिलासा देणारी बातमी समोर आली आहे. राज्य सरकरने आज अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. नुकसानभरपाईच्या रकमेत सरकारकडून दुपटीने वाढ करण्यात आली आहे.**



जिरायतीच्या पिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना ६ हजार ८०० रुपये प्रती हेक्टर एवजी १३ हजार ६०० रुपये प्रति हेक्टर इतकी मदत देण्यात येणार आहे. तर बागायती पिकांच्या नुकसानीसाठी १३ हजार ५०० प्रती हेक्टर एवजी २७ हजार प्रतिहेक्टर देण्यात येणार आहेत. तर बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी १८ हजार प्रती हेक्टर एवजी ३६ हजार रुपये प्रती हेक्टर देण्यात येणार आहेत. महसूल आणि वनविभागाने हा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

**⏭ जिरायतीच्या पिकांच्या नुकसानीसाठी शेतकऱ्यांना ६ हजार ८०० रुपये प्रती हेक्टर एवजी १३ हजार ६०० रुपये प्रति हेक्टर इतकी मदत देण्यात येणार आहे. तर बागायती पिकांच्या नुकसानीसाठी १३ हजार ५०० प्रती हेक्टर एवजी २७ हजार प्रतिहेक्टर देण्यात येणार आहेत. तर बहुवार्षिक पिकांच्या नुकसानीसाठी १८ हजार प्रती हेक्टर एवजी ३६ हजार रुपये प्रती हेक्टर देण्यात येणार आहेत. महसूल आणि वनविभागाने हा निर्णय जाहीर केला आहे. यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

जून आणि ऑक्टोबरमहिन्यात राज्यातील अनेक ठिकाणी अतिवृष्टी झाली होती. यानंतर झालेल्या नुकसानीसाठी मदतीची मागणी केली जात होती. यानंतर शेतकऱ्यांना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मदत करण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानंतर पावसामुळे राज्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यामध्ये ५ हजार ४३९ कोटींचा निधी तरतूद करण्यात आला आहे.

# मुख्यमंत्री बोम्मईंच्या फेक ट्वीट दाव्यावरून उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल

। नागपूर । महाईन्यूज ।

महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमावादावरून बुधवारी दिल्लीतील संसद भवनात महत्वपूर्ण बैठक झाली. गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत ही बैठक पार पडली. या बैठकीला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई उपस्थित होते.

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई यांच्या नावाने महाराष्ट्रसंबंधी वादग्रस्त ट्वीट करण्यात आलं होतं. त्या बैठकीत हा मुद्दा अमित शाह यांच्यासमोर उपस्थित करण्यात आला. त्यावर, ते अकाउंट आपलं नव्हत, अशी माहिती बसवराज बोम्मई यांनी दिली. तसेच, तपास करून योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन बोम्मईंनी दिलं. यावरून आता शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंनी बोम्मई यांच्यावर हल्लाबोल केला आहे. "गेली १५ ते २० दिवस हा प्रश्न हा चिघळला जात आहे. मुख्यमंत्र्यांचं ट्वीटर हॅक झालं, तो शोध होईल. पण, खुलासा होण्यास एवढे दिवस का लागले. बेळगावातील मराठी बांधवांवर पोलीस कारवाई आणि महाराष्ट्रातील वाहनांना प्रत्यक्ष बंदी झाली होती. मग जर ट्वीटर हॅक झालं होतं, तर मुख्यमंत्री कार्यालय सजग आणि जागृत असायला पाहिजे, की आपल्या ट्वीटरवरून कोण काय बोलतं. तो खुलासा दिल्लीत बैठक होईपर्यंत का थांबला होता. सर्वोच्च न्यायालयात प्रकरण असताना दोन्ही राज्यांनी काही करु नये, हा नवीन सल्ला नाही आहे."

"सर्वोच्च न्यायालयात हे प्रकरण असताना बेळगावला उपराजधानीचा दर्जा दिला की, यापूर्वी दिला. विधानसभेच अधिवेशन आधीपासून सुरु आहे की, नंतर सुरु आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निकाल लागेपर्यंत केवळ महाराष्ट्राने थांबायचं का? या सर्व गोष्टींचा उहापोह नुसता 'पोहे' खाऊन निघणार असेल तर काही अर्थ नाही," असेही उद्धव ठाकरेंनी म्हटलं आहे.



# चीनला टक्कर देणारा भारत देश!

## जर्मनीचे राजदूत फिलीप एकरमॅन यांनी केले कौतुक, रशिया आणि युक्रेन युद्धाचा परिणाम जगावर

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जगात भारताशिवाय दुसरा कोणताही देश नाही, जो चीनला टक्कर देऊ शकेल, असं कौतुक जर्मनीने केलं आहे. काही दिवसांपूर्वी अरुणाचल प्रदेश येथील प्रत्यक्ष नियंत्रण रेषेवर भारत आणि चीन सैनिकांमध्ये जोरदार झटापट झाली. या झटापटीत दोन्ही देशांचे सैनिक जखमी झाले होते. भारत-चीन हा चिंतेचा विषय आहे.**



आंतरराष्ट्रीय सीमांचं उल्लंघन होता कामा नये. विकासाच्या बाबतीत भारताशिवाय इतर कोणताही दुसरा देश चीनसोबत स्पर्धा करू शकत नाही, असं जर्मनीचे राजदूत फिलीप एकरमॅन यांनी एका मुलाखतीत सांगितलं. युरोपीय देशातील रशिया आणि युक्रेन युद्धाचा परिणाम जगावर झाला आहे. जनजीवन विस्कळीत झाले आहे. आर्थिक परिस्थितीही बिघडली आहे. असं असताना भारत-चीनमधील समस्या हा चिंतेचा विषय आहे. त्यामुळे विकास, लोकसंख्या आणि इतर बाबींमध्ये भारताशिवाय दुसरा कोणताही देश चीनला टक्कर देऊ शकत नाही, असं फिलीप यांनी सांगितलं.

एटीएफचा करार झाला पाहिजे. कारण यामुळे जर्मनी आणि भारतामधील व्यवसायिक संबंध सुधारू शकतील. सध्या जर्मनी चीनवर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहे. त्यामुळे अन्य देशांशी जर्मनीला व्यापार वाढवावा लागणार आहे. मात्र, भारताकडून आम्हाला अपेक्षित प्राधान्य मिळताना दिसत नाही, अशी खंतही फिलीप यांनी बोलून दाखवली.

अरुणाचलमधील तवांग येथील घटनेबाबत केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी लोकसभेत निवेदन दिले आहे. यावेळी ते म्हणाले की, "9 डिसेंबर 2022 रोजी, पीएलए जवानांनी स्थिती बदलण्याचा प्रयत्न केला. भारतीय सैन्याने त्याचा खंबीरपणे सामना केला. यादरम्यान हाणामारीही झाली. भारतीय लष्कराने चिनी सैनिकांना अतिक्रमण करण्यापासून रोखले आणि त्यांना त्यांना परत पाठवले.

यादरम्यान भारतीय सैन्याचा एकही जवान शहीद झाला नाही किंवा कोणीही जखमी झाला नाही. या घटनेनंतर, तेथील स्थानिक कमांडरने 11 डिसेंबर 2022 रोजी प्रस्थापित व्यवस्थेअंतर्गत आपल्या चिनी समकक्षासोबत ध्वज बैठक घेतली आणि घटनेवर चर्चा केली. चीनच्या बाजूने सीमेवर शांतता राखण्यास सांगितले होते. हा मुद्दा चीनच्या बाजूने राजनैतिक पातळीवरही मांडण्यात आला आहे.

# भारताने हे क्षेपणास्त्र डागलं तर इतक्या देशांमध्ये माजेल हाहाःकार

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

भारताच्या सगळ्यात शक्तिशाली 'अग्नी-५' या क्षेपणास्त्राची आज यशस्वी चाचणी झाली. पाच ते साडेपाच हजार किलोमीटरपर्यंत लक्ष्य भेदण्याची क्षमता या मिसाईलमध्ये आहे.



भारताने हे क्षेपणास्त्र डागलं तर जगामध्ये हाहाःकार माजेल. पूर्ण आशिया खंड, युरोपचा काही भाग, युक्रेन, रशिया, जपान ते इंडोनेशियापर्यंत मारा करणं भारताला शक्य होईल. सर्वात महत्त्वाचं म्हणजे एमआयआरव्ही हे तंत्रज्ञान या मिसाईलमध्ये वापरण्यात आलेलं आहे. त्यामुळे मिसाईलच्या वरच्या भागात बसवल्या जाणाऱ्या वॉरहेडची संख्या वाढवता येणार आहे. त्याने एक मिसाईल एकावेळी निरनिराळ्या लक्ष्यांना भेदू शकेल.



### शक्तिशाली क्षेपणास्त्र

**अग्नी-५ या क्षेपणास्त्राचं वजन ५० हजार किलोग्रॅम आहे. याची लांबी १७.५ मीटर तर व्यास २ मीटर म्हणजे ६.७ फूट आहे. या मिसाईलच्या वरच्या भागावर १ हजार ५०० किलोग्रॅमच्या वजनाचं अण्विक अस्त्र लाँच करता येईल. यामध्ये तीन स्तरावरील रॉकेट बुस्टर आहेत. याचा वेग ध्वनीवेगाच्या २४ पट अधिक आहे. म्हणजे एका सेकंदात ८.१६ किलोमीटरचं अंतर पार करणं या क्षेपणास्त्राला शक्य आहे.**

### आवाक् करणारा वेग

**अग्नी-५ मिसाईल २९ हजार ४०१ प्रतितास किलोमीटरच्या वेगाने शत्रुवर हल्ला करु शकतं. यामध्ये जीपीएस, रिंग लेजर गायरोस्कोप इनर्शियल नेविगेशन सिस्टिम आणि सॅटेलाईट गाईडन्स सिस्टिम आहे. त्यामुळे एका झटक्यात शत्रुला लक्ष्य करण्याची याची क्षमता आहे. जर टार्गेट जागेवरुन १० ते ८० मीटर सरकलं तरीही त्याचं वाचणं अवघड आहे.**

# ब्रिटनमधील १ लाख परिचारिका संपावर!

## अधिक वेतनासह अन्य मागण्यांसाठी आजवरचे सर्वात मोठे आंदोलन

। लंडन। महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।



ब्रिटनच्या राष्ट्रीय आरोग्य सेवेमधील (एनएचएस) सुमारे १ लाख परिचारिका गुरूवारपासून संपावर गेल्या आहेत. हे इतिहासातील आजवरचे सर्वात मोठे आंदोलन ठरले आहे. वेतनवाढीसह अन्य प्रमुख मागण्यांसाठी आरोग्य सेवेतील कर्मचाऱ्यांनी संपाचे हत्यार उपसले असून संपकरी परिचारिकांमध्ये अनेक भारतीयही आहेत. इंग्लंड, उत्तर आर्यलंड आणि वेल्स या तीन्ही प्रांतांमधील परिचारिकांनी गुरूवारी कामबंद आंदोलन केले. या संपामुळे ब्रिटनची आरोग्य सेवा मोठ्या प्रमाणात विस्कळित झाली. देशभरातील बाह्यरुग्ण विभाग आणि शस्त्रक्रीयांवर मोठा परिणाम झाला. तातडीच्या आणि जीवरक्षक सेवा मात्र सुरू ठेवण्यात आल्या होत्या. या आंदोलनाचा पुढचा टप्पा म्हणून मंगळवारी पुन्हा एकदा कामबंद आंदोलनाची हाक देण्यात आली आहे. वाढत्या महागाईचा सामना करणे कठीण होत असल्यामुळे वेतनवाढीची मुख्य मागणी करत गेल्या महिन्यात या संपाची हाक देण्यात आली होती. ब्रिटनच्या ऋषी सुनक सरकारने चर्चा करून मार्ग काढावा, असा सल्ला काही अतिउजव्या माध्यमांनीही दिला होता. आठवड्याच्या सुरूवातीला संपाचे नेतृत्व करणाऱ्या रॉयल कॉलेज ऑफ नर्सिंगच्या प्रतिनिधींची सरकारसोबत झालेली चर्चा निष्फळ झाली होती. विरोधी मजूर पक्षाने या संपावरून सत्ताधारी पक्षावर टीकेची झोड उठविली आहे.

# विषारी दारूप्रकरणी बिहार सरकारवर कारवाई करा!

**नवी दिल्ली :** बिहारमध्ये विषारी दारू प्राशन केल्याने बिहारमध्ये ४० जणांचा मृत्यू झाल्याने या प्रकरणी केंद्र सरकारने बिहार सरकारवर कारवाई करावी, अशी मागणी लोकसभेतील भाजप खासदारांनी गुरुवारी केली. या घटनेला मुख्यमंत्री नितीश कुमार जबाबदार असल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला. लोकसभेत शून्य तासाला पश्चिम चंपारणचे खासदार संजय जैस्वाल यांनी हा मुद्दा उपस्थित केला. बिहारमध्ये बंदी असतानाही पोलीस अधिकाऱ्यांच्या संरक्षणात बनावट दारूची विक्री केली जाते. मात्र मुख्यमंत्री कोणतेही कारवाई करत नाही, असे जैस्वाल म्हणाले. "ही बिहार सरकार पुरस्कृत ४० लोकांची हत्या आहे. राज्यात बंदी असतानाही पोलिसांच्या मदतीने आणि संरक्षणासह पोलिसांकडून प्रत्येक घराघरात बनावट दारूचा पुरवठा केला जातो," असा आरोप जैस्वाल यांनी केला. औरंगाबादचे भाजप खासदार सुशील कुमार सिंह यांनी या दुर्घटनेतील मृत्यूंना 'सामुहिक हत्या' असे संबोधले आणि त्यासाठी बिहार सरकारला जबाबदार धरले.

# पूजा हेगडेने गायलं मराठी भक्तीगीत..

बॉलीवुड आणि टॉलीवुड अभिनेत्री पूजा हेगडे सध्या भलतीच चर्चेत आली आहे. मध्यंतरी ती सलमान सोबत डेट करत असल्याच्या चर्चा उठल्या होत्या. तर आता तिचा 'सर्कस' हा चित्रपट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. अत्यंत तडगी स्टारकास्ट असलेल्या या सिनेमाच्या प्रमोशनसाठी पूजा, रणवीर सिंग आणि संपूर्ण टीम सर्वत्र भेट आहेत. याच निमित्ताने ते 'झी मराठी' वरील 'चला हवा येऊ द्या' या कार्यक्रमात आले होते. यावेळी पूजाने चक्क मराठी भक्तीगीत गाऊन सर्वांना आश्चर्याचा धक्काच दिला.



गेल्या काही वर्षांपासून 'चला हवा येऊ द्या'(Chala Hawa Yeu Dya) हा कार्यक्रम रसिक मनांचं मनोरंजन करत आहे,न थकता,न चुकता. यातील कुशल बद्रिके,भाऊ कदम(Bhau Kadam), श्रेया बुगडे(Shreya Bugde),गणेश भारतपुरे,सागर कारंडे,डॉ. निलेश साबळे(Dr. Nilesh Sable) या सहा जणांची टीम नुसती धमाल उडवत असते. त्यामुळे मराठीच नाही तर बॉलीवुडलाही या कार्यक्रमाची भुर पडली आहे. त्यामुळे अनेक बॉलीवुड कलाकार आपल्या चित्रपटाचे प्रमोशन करण्यासाठी या कार्यक्रमात येत असतात. यंदा 'सर्कस' चित्रपटाच्या टीमने हजेरी लावली होती. यावेळी अभिनेता सिद्धार्थ जाधव, रणवीर सिंग, दिग्दर्शक रोहित शेट्टी, अभिनेत्री पूजा हेगडे, जॉनी लिव्हर, जॅकलिन फर्नांडिस आणि अनेक कलाकार उपस्थित होते. यावेळी पूजा हेगडेला मराठी गाणं गाण्याची विनंती करण्यात आली आणि तिने चक्क भक्तीगीत गायला सुरूवात केली. यावेळी पूजाने 'देहाची तिजोरी.. भक्तीचाच ठेवा.. उघड दार देवा आता.. उघड दार देवा' हे मराठीतील लोकप्रिय भक्तीगीत गायलं. तिच्या तोंडून ही भजन आल्याने सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला. निले[...] साबळे सह सर्वांनीच तिच्यास[...] जोरदार टाळ्या वाजवल्[...]

# 'साथ सोबत' चित्रपटाचा टिझर प्रदर्शित

'साथ सोबत' या आगामी मराठी चित्रपटाचा टिझर नुकताच प्रदर्शित झाला आहे. सोशल मीडियावर रिलीज करण्यात आलेल्या 'साथ सोबत'च्या टिझरला नेटकऱ्यांकडून अल्पावधीतच भरभरून प्रतिसाद मिळत आहे. राष्ट्रीय पारितोषिक विजेते दिग्दर्शक रमेश मोरे यांनी 'साथ सोबत' या चित्रपटात काहीसं वेगळं कथानक सादर केल्याची जाणीव टिझर पाहिल्यावर होते. हा नवा कोरा चित्रपट १३ जानेवारी २०२३ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

प्रसन्न वैद्य यांची प्रस्तुती असलेल्या 'साथ सोबत' या चित्रपटाची निर्मिती धनजी मारू यांनी मारू एन्टरप्रायझेस या बॅनरखाली केली आहे. दिग्दर्शनासोबतच या चित्रपटाचं लेखनही रमेश मोरे यांनीच केलं आहे. पिकल एंटरटेन्मेंटचे समीर दीक्षित आणि ऋषिकेश भिरंगी हे वितरणाच्या माध्यमातून हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात पोहोचवणार आहेत. 'साथ सोबत'च्या टिझरची आपली काही वैशिष्ट्ये आहेत. नायकाच्या मुखातील केवळ एक संवाद उत्सुकता वाढवणारा आहे. 'साथ सोबत'च्या रूपात तांत्रिकदृष्ट्या सक्षम चित्रपट पहायला मिळणार असल्याची चाहूल टिझर पाहिल्यावर लागते. यातील नयनरम्य निसर्ग मन मोहून टाकणारा आहे. सुरेख कॅमेरावर्क, नयनरम्य लोकेशन्स आणि मातब्बर कलाकारांचा सहजसुंदर अभिनय या चित्रपटाचा सर्वात मोठा प्लस पॉइंट ठरणार असल्याचं टिझरवरूनच जाणवतं. या चित्रपटात गावाकडची प्रेमकथा पहायला मिळणार आहे.




भपकेबाजपणापासून दूर असलेली साधी भोळी लव्हस्टोरी हेच या चित्रपटाचं खरं सौंदर्यस्थळ ठरणार आहे.

प्रेमकथेसोबतच एक महत्त्वपूर्ण संदेशही चित्रपटात दडलेला आहे. मालिका, चित्रपट, नाटक या तिन्ही माध्यमांमध्ये आपला ठसा उमटवण्यात यशस्वी झालेला संग्राम समेळ मुख्य भूमिकेत आहे. त्याच्या जोडीला नवोदित अभिनेत्री मृणाल कुलकर्णी आहे. त्यामुळे नव्या जोडीची अनोखी केमिस्ट्री 'साथ सोबत'मध्ये रसिकांना अनुभवायला मिळणार आहे. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या गेलेल्या चित्रपटांचं दिग्दर्शन करणाऱ्या रमेश मोरेंच्या कल्पक दिग्दर्शनाचा स्पर्श या चित्रपटाला लाभला आहे.

# 'तू झूठी मैं मक्कार' चित्रपटाचे टायटल रीलीज

लव फिल्म्सने अलीकडेच आपल्या आगामी चित्रपटाच्या शीर्षकाचा एक टिझर प्रदर्शित केला ज्यामध्ये दर्शकांना रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर अभिनीत आगामी चित्रपटाच्या शीर्षकाची झलक पाहायला मिळाली. तसेच, निर्मात्यांनी या टिझरमध्ये शीर्षकाच्या "TJMM"या इनीशियल्सचे अनावरण केले होते, त्यामुळे दर्शकांमध्ये चित्रपटाचे शीर्षक काय असेल यावरून उत्कंठा वाढत असतानाच निर्मात्यांनी अखेरीस या चित्रपटाचे टायटल रिलीझ केले आहे. अशातच, लव फिल्म्सने रणबीर कपूर आणि श्रद्धा कपूर अभिनीत आगामी चित्रपटाचे टायटल 'तू झूठी मैं मक्कार'चे अनावरण केले आहे. तसेच,



प्रीतमद्वारा म्युजिक आणि अमिताभ भट्टाचार्यद्वारा लिरिक्सकडे इशारा करताना, व्हिडिओचे शीर्षक रणबीर आणि श्रद्धा यांच्यातील मजेदार केमिस्ट्रीची ओळख करून देते.टायटल व्हिडिओमध्ये श्रद्धा आणि रणबीर कपूर यांनी साकारलेल्या 'झूटी' आणि 'मक्कार' या पात्रांसह चित्रपटाच्या खोडकर जगाची झलक पाहायला मिळते.

# विशाखा सुभेदार करणार मालिकेत पुनरागमन



अभिनेत्री विशाखा सुभेदार हिला कायमच विनोदी भूमिकांसाठी ओळखले जाते. तिने कायमच मराठी मालिका आणि चित्रपटातून आपला ठसा उमटवला आहे. विशाखा सुभेदारने 'फू बाई फू' आणि 'कॉमेडीची बुलेट ट्रेन' या कॉमेडी शोमधून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. तर महाराष्ट्राची हास्यजत्रा या कार्यक्रमातून ती घराघरात पोहोचली. गेल्या काही दिवसांपासून ती तिच्या कुर्रर्रर्रर्र या नाटकात व्यस्त आहे. यानंतर आता विशाखा सुभेदार ही पुन्हा छोट्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे.

स्टार प्रवाह वाहिनी ही कायमच दर्जेदार मालिकांसाठी ओळखली जाते. स्टार प्रवाह वाहिनीने लाखो प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले आहे. येत्या नवीन वर्षात स्टार प्रवाहवरील अनेक नव्या मालिका प्रेक्षकांच्या भेटीसाठी सज्ज होणार आहेत. अभिनेत्री विशाखा सुभेदार ही लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. विशाखा सुभेदार ही लवकरच एका मालिकेद्वारे पुनरागमन करणार आहे. स्टार प्रवाह वाहिनीवर येत्या १६ जानेवारीपासून दुपारी २ वाजता नवी मालिका प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. शुभविवाह असे या मालिकेचे नाव आहे. बहिणीच्या स्वप्नासाठी आपलं आयुष्य पणाला लावणाऱ्या भूमीच्या त्यागाची गोष्ट यात दाखवली जाणार आहे. या मालिकेत मधुरा देशपांडे, यशोमन आपटे, विशाखा सुभेदार, कुंजिका काळविंट, अभिजीत श्वेतचंद्र हे कलाकार प्रमुख भूमिकेत पाहायला मिळत आहे.



# पठाणचा वाद पेटला! शाहरुख-दीपिकाचे पुतळे जाळले

इंदौर - 'बॉलिवूडचा बादशाह' म्हणून प्रसिद्ध असलेला शाहरुख खान आणि अभिनेत्री दीपिका पदुकोण यांच्या आगामी 'पठाण' चित्रपट चित्रपटातील 'बेशरम रंग...' हे गाणे प्रदर्शित झालं आहे. मात्र या गाण्यातील वेशभूषेवरून वाद निर्माण झाला असून इंदौर शहरात एका संघटनेने निदर्शने केली. तसेच शाहरुख-दीपिकाचे पुतळे जाळले.

इंदौरच्या माळवा मिल चौकात 'वीर शिवाजी ग्रुप'चे कार्यकर्ते जमले आणि त्यांनी 'पठाण'मधील 'बेशरम रंग' या गाण्याचा विरोध केला. त्यांनी बॉलिवूड अभिनेता शाहरुख खान आणि दीपिका पादुकोण यांचे पुतळेही जाळले. या गाण्यातील आशयामुळे हिंदूंचा अपमान झाला असून भावना दुखावल्याचा आरोप करत पुढील वर्षी जानेवारीत प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटावर बंदी घालण्याची मागणी आंदोलकांनी केली. तत्पूर्वी, मध्य प्रदेशचे गृहमंत्री आणि राज्य सरकारचे प्रवक्ते नरोत्तम मिश्रा यांनी इंदौरमध्ये महू शहराजवळील भगवान परशुरामाचे जन्मस्थान जनापव कुटी येथे प्रार्थना केल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, अभिनेता शाहरुख आणि अभिनेत्री दीपिकाने हिरव्या आणि भगव्या रंगाचे कपडे घातले आहेत.

# कुलदीप यादवच्या फिरकीपुढे बांगलादेशने टाकली नांगी!

## दुसऱ्या दिवस अखेर 271 धावांनी पिछाडीवर

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था



झहूर अहमद चौधरी स्टेडियम चट्टोग्राम येथे भारत विरुद्ध बांगलादेश पहिला कसोटी सामना खेळला जात आहे. या कसोटी सामन्यातील आज दुसरा दिवस आहे. भारताने आपल्या पहिल्या डावात ४०४ धावा केल्या आहेत. तसेच बांगलादेशच्या पहिल्या डावात दुसऱ्या दिवसाच्या समाप्तीपर्यंत ४४ षटकांत ८ बाद १३३ धावा केल्या आहेत. त्यामुळे बांगलादेश संघ अजूनही २७१ धावांनी पिछाडीवर असल्याने अडचणीत सापडला आहे.

बांगलादेश संघाला पहिला धक्का नजमुल हुसेन शांतोच्या रुपाने बसला. तो संघाचे आणि स्वत:चे खाते उघडण्या अगोदर बाद झाला. त्याच्या पाठोपाठ यासिर अली देखील ४ धावा काढून बाद झाला. त्यामुळे बांगलादेश संघ अडचणीत आला. त्यानंतर २४.२ षटकात बांगलादेशचा निम्मा संघ तंबूत परतला होता. तेव्हा संघाची धावसंख्या ७५ अशी होती.

दरम्यान यानंतर ही संघाची पडझड सुरु राहिल्याने संघ दबावात सापडला. बांगलादेशकडून फलंदाजी करताना मुशफिकर रहीमने सर्वाधिक धावा केल्या. त्याने ५८ चेंडूत ३ चौकारांच्या मदतीने २८ धावा केल्या. त्याचबरोबर लिटन दास (२४) आणि झाकिर हसनने (२०) थोड्या प्रमाणात धावा केल्या. मात्र इतर चार फलंदाजांना दोन आकडी धावसंख्या सुद्धा पार करता आली नाही. त्यामुळे बांगलादेशने ४४ षटकाच्या समाप्तीनंतर ८ बाद १३३ धावा केल्या आहेत. त्याचबरोबर भारताच्या तुलनेत २७१ धावांनी मागे आहेत.

दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा मेहदी हसन १६ आणि इबादोत हुसेन १३ धावांवर नाबाद आहे. भारतीय संघाकडून गोलंदाजी करताना, फिरकीपटू कुलदीप यादवने सर्वाधिक विकेट्स घेतल्या. त्याने ४ विकेट्स घेतल्या. त्याचबरोबर मोहम्मद सिराजने दुसऱ्या बाजूने वेगवान मारा सुरुच ठेवताना ३ विकेट्स घेतल्या. तसेच उमेश यादवने १ विकेट घेतली.

# मोरोक्को विरूद्धच्या सामन्यानंतर फ्रान्समध्ये तूफान राडा

नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

कतारमध्ये सुरू असलेल्या फिफा वर्ल्डकपमध्ये दुसऱ्या सेमी फायनल सामन्यात फ्रान्सने मोरोक्कोचा 2 - 0 असा पराभव करत सलग दुसऱ्यांदा अंतिम फेरी गाठली. मात्र याच दरम्यान, फ्रान्समध्ये दोन्ही संघांच्या फुटबॉल चाहत्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर हिंसाचार उसळला. या हिंसाचारात 14 वर्षाच्या एका युवकाचा मृत्यू झाला. यानंतर दक्षिण फ्रान्समध्ये मोठ्या प्रमाणावर पोलीस बंदोबस्त ठवण्यात आला आहे. फ्रान्सने बरेच वर्षे मोरोक्कोवर राज्य केले होते. त्यामुळे या सामन्याला एक ऐतिहासिक पार्श्वभूमी होती.

दक्षिण फ्रान्समधील एका शहरातील स्थानिक अधिकाऱ्यांनी माहिती दिली की ओळख न पटलेल्या एका 14 वर्षाच्या मुलाला एका गाडीने उडवल्याने त्याचा मृत्यू झाला. दरम्यान, हेराऊल्ट

**14 वर्षाच्या मुलाचा मृत्यू**

खासदार नताले ओझिओल यांनी 'एक खेळाचा सामना अशा प्रकारे दुर्दैवी आणि दुःखद घटनेत रूपांतरित झाल्याने खूप वेदना होत आहे. मृत मुलाच्या कुटुंबियांप्रती माझ्या सहवेदना.' असे ट्विट केले. फ्रान्सबरोबरच शेजारील बेल्जियममध्ये देखील हिंसाचार झाल्याचे वृत्त आहे. सामन्यानंतर ब्रसेल्समध्ये जवळपास 100 मोरोक्कन चाहते पोलिसांशी भिडले होते.

मोरोक्कोविरूद्धचा सामना झाल्यानंतर फ्रान्समधील तरूण संघाचा विजय साजरा करण्यासाठी पॅरिसमध्ये हजारोंच्या संख्येने रस्त्यावर उतरली होती. यावेळी मोठा पोलीस बंदोबस्त देखील ठेवण्यात आला होता. तरी देखील राजधानी तसेच फ्रान्सच्या इतर शहरात देखील मोरोक्को आणि फ्रान्सच्या चाहत्यांमध्ये संघर्ष झालाच.

# ईश्वरी सावकारचे धमाकेदार दीडशतक!

## महाराष्ट्राचा विदर्भावर विजय

नाशिक ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था




डेहराडून येथे भारतीय क्रिकेट नियामक मंडळ (बीसीसीआय) तर्फे आयोजित राष्ट्रीय पातळीवरील महिला एकदिवसीय क्रिकेट स्पर्धेत महाराष्ट्राने विदर्भ संघाचा पराभव केला आहे. १९ वर्षाखालील महिलांच्या महाराष्ट्र संघाकडून खेळताना नाशिकच्या ईश्वरी सावकार हिने या सामन्यात घणाघाती दीडशतक झळकावले.

नाशिकच्या महिला क्रिकेटपटूने राष्ट्रीय पातळीवरील महिला स्पर्धेत कर्णधारपद भूषविताना थेट दीडशतक झळकावत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघाची कर्णधार ईश्वरीने १५५ चेंडूत २० चौकार, एक षटकार ठोकत १५१ धावा फटकावल्या.

यामुळे महाराष्ट्राने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ५० षटकांत ५ बाद २७७ अशी धावसंख्या उभारली. ईश्वरीला के. एन. मुल्लाने नाबाद ५८ धावांची साथ दिली. उत्तराखल विदर्भाला ५० षटकांत ८ बाद १८५ इतकीच मजल मारता आल्याने महाराष्ट्राने ईश्वरी सावकारच्या नेतृत्वात ९३ धावांनी मोठा विजय मिळवला.

नाशिकची अष्टपैलू शाल्मली क्षत्रियचीदेखील या महाराष्ट्र संघात असून तिने दोन षटकात ९ धावा दिल्या. डेहराडून येथे खेळल्या जात असलेल्या या स्पर्धेत १९ वर्षाखालील महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड सार्थ ठरवत ईश्वरी सावकारने विजयी सुरवात केली. महाराष्ट्र संघाने अरुणाचल, पुंडूचेरी पाठोपाठ गोवा संघावर ९ गडी राखून जोरदार विजय मिळवला होता.

प्रथम फलंदाजी केलेल्या गोवाला ३६ षटकांत ६६ धावांत गुंडाळल्यानंतर कर्णधार ईश्वरी सावकारने नाबाद ३२ धावा करत महाराष्ट्र संघाला अकराव्या षटकातच ९ गडी राखून विजयी केले होते. तर शाल्मली क्षत्रियने ५ षटकात १३ धावा दिल्या व एक गडी बाद केला. आता विदर्भ संघालाही पराभूत केले. ईश्वरी सावकारच्या नेतृत्वात हा पाच सामन्यातील चौथा विजय आहे.

> महाराष्ट्राने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करत ५० षटकांत ५ बाद २७७ अशी धावसंख्या उभारली. ईश्वरीला के. एन. मुल्लाने नाबाद ५८ धावांची साथ दिली. उत्तराखल विदर्भाला ५० षटकांत ८ बाद १८५ इतकीच मजल मारता आल्याने महाराष्ट्राने ईश्वरी सावकारच्या नेतृत्वात ९३ धावांनी मोठा विजय मिळवला.

# भुसावळची प्रियंका ठरली बेस्ट बॉक्सर



भुसावळ (जि. जळगाव) ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था

शहरातील संत गाडगेबाबा महाराज हिंदी महाविद्यालय व छत्रपती शाहू महाराज बॉक्सिंग अकॅडमीचे खेळाडू असलेले तीन मुले, दोन मुली व एक औरंगाबाद विद्यापीठाचा विद्यार्थी अशा सहा जणांची 'ऑल इंडिया युनिव्हर्सिटी चॅम्पियशिप'साठी निवड झाली आहे. यात जळगाव जिल्ह्यात प्रथमच भुसावळच्या महिला बॉक्सिंग खेळाडूची बेस्ट बॉक्सर म्हणून निवड झाली आहे.

नागपूर येथे नुकत्याच बॉक्सिंगच्या स्पर्धा झाल्या. या स्पर्धेत संत गाडगेबाबा महाराज हिंदी महाविद्यालयाचे व श्री छत्रपती शिवाजी महाराज बॉक्सिंग अॅकॅडमीचे विद्यार्थी ४६ ते ४८ प्रथमेश आव्हाड, ५१ ते ५४ गोपाळ दीपक खंडारे ४८ ते ५१ अमन भालेराव, ४५ ते ४८ प्रियंका चिंतामणी शिरसाळे, ४८ ते ५० पूजा अण्णा शिंदे तर याच बरोबर औरंगाबाद विद्यापीठाचा विद्यार्थी ५१ ते ५४ रितेश मोरे या विद्यार्थ्याची ऑल इंडिया युनिव्हर्सिटी चॅम्पियनशिपसाठी निवड झाली आहे.

नागपूर येथे झालेल्या २१ व्या वरिष्ठ महिला बॉक्सिंग राज्य अजिंक्यपद स्पर्धेत छत्रपती शाहू महाराज बॉक्सिंग अकॅडमीच्या प्रियंका शिरसाळेने महाराष्ट्र राज्यात सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणजे बेस्ट बॉक्सर ट्रॉफी मिळवली व सुवर्णपदक पटकावून जिल्ह्याची पहिली वरिष्ठ महिला बॉक्सर असा मान मिळवला आहे.